1145

जा.क्र.मसंके/टेट/४४८/२०२३

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली

टेटवली विभाग

ता. दापोली, जि. रत्नागिरी

दिनांक :— ३१/०३/२०२३

03 APR 2023

प्रति,

मा. प्रभारी अधिकारी

कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

विषय :— टेटवली प्रक्षेत्रावरील कंत्राटी पध्दतीने ''प्रक्षेत्र सहाय्यक'' पद भरती जाहीरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दीस देणेबाबत....

महोदय,

उपरोक्त विषयान्वये मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत टेटवली विभाग प्रक्षेत्रावर ''प्रक्षेत्र सहाय्यक'' या पदाची २ पदे कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत. तरी याबाबतची जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर **(www.dbskkv.org)** वर प्रसिध्द करावी.

सोबत :— वरीलप्रमाणे

संचालक

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकली

ता. दापोली, जि. रत्नागिरी

# मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (४१५७११)

## टेटवली विभाग

ता. दापोली, जि. रत्नागिरी.

---

जा.क्र.मसंके/टेट–प्रअ/ १४८ /२०२३ दिनांक :– ३१/०३/२०२३

## जाहिर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली अंतर्गत टेटवली विभाग येथे प्रक्षेत्रावरील कामे पूर्ण करणेसाठी दोन कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक माहे मे २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीसाठी खालील प्रमाणे नमुद केलेली कामे करावयाची आहेत. तरी इच्छूक अर्जदारांनी त्यांची खालील शैक्षणिक अर्हता, संगणकीय कामकाजाचे अनुभव, इतर शैक्षणिक अर्हता आणि नमुद केलेल्या कामांचे स्वरूप लक्षांत घेऊन आपले अर्ज या कार्यालयास **दिनांक :– २०/०४/२०२३** पर्यत मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली यांचे नावे बंद लखोटयातून बंद करून हातबटवडा/टपालाने पाठवावीत. **''लखोटयावर कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक पदासाठी अर्ज''** असा स्पष्ट उल्लेख असावा.

**कामाचे स्वरूप**

| अ.क्र | कामाचा तपशिल |
|---|---|
| १. | प्रक्षेत्रावरील आंबा, काजु, नारळ, सुपारी, चिकु इ. फळपिकांच्या बागांची साफसफाई मजुरांकडुन करून घेण्याचे नियोजन करणे. |
| २. | प्रक्षेत्रावरील आंबा, काजु, कोकम, जांभुळ, जाम, सोनचाफा, फणस, करवंद, आवळा, शेवगा, सुपारी व नारळ इत्यादी रोपवाटिकेमध्ये बांधणीचे व विक्रीचे व्यवस्थापन करणे. |
| ३. | प्रक्षेत्रावरील हंगामनिहाय पिकांची लागवड करणे. |
| ४. | प्रक्षेत्रावरील आंबा फळे, काजु बी, चिकु फळे, कोकम फळे, नारळ फळे, शहाळी इ. काढणीचे व्यवस्थापन करणे. |
| ५. | प्रक्षेत्रावरील मजुरांची हजेरी घेणे व त्यांच्या दैनंदीन कामांचे नियोजन करणे. |
| ६. | कार्यालयामधील पत्रव्यवहार करणे. प्रशासकीय नस्ती तयार करणे. |

**कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक पदासाठी आवश्यक अर्हता :–**

- उमेदवार हा कृषि पदविका किंवा कृषि पदवी (पशु विज्ञान शास्त्र/अन्नशास्त्र कृषि तंत्रज्ञान/कृषि अभि/मृद विज्ञान,मत्स्य विज्ञान/कृषि जैव तंत्रज्ञान कृषि व्यवस्थापन) धारक असावा.
- MS-CIT संगणकीय हाताळणी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- विद्यापीठ प्रक्षेत्रावरील व कार्यालयीन कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

ठिकाण :– टेटवली

दिनांक :– ३१/०३/२०२३

संचालक

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली

ता. दापोली, जि. रत्नागिरी

**प्रत, माहिती व प्रसिध्दीसाठी.....**

१. ग्रामपंचायत कार्यालय, वाकवली, पांगारी, टेटवली, सुखदर

२. सुचना फलक, संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.

३. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली.

## उपरोक्त पद भरण्यासाठी नियम व अटी खालील प्रमाणे आहेत

- उपरोक्त पदांसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांची वयोमर्यादा ही खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ३८ वर्षे आणि मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ४३ वर्षे अशी राहिल.
- सदर कामे सन २०२३—२४ या कालावधीकरीता राहिल. प्रक्षेत्रावरील/कार्यालयीन कामकाजाचे स्वरुप पाहून सदर कामे चालू ठेवण्यात येतील अथवा कोणतेही कारण न देता केव्हाही समाप्त केला जाईल.
- सदरची कंत्राटी नियुक्ती कामाचा उरक आणि अचुकता इत्यादी बाबी समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहिल असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता सदरची कंत्राटी नियुक्ती रदद करण्यात येईल.
- प्रक्षेत्र/कार्यालय काम करतेवेळी काही अपघात/इजा झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही आणि कोणतेही विमा कवच व प्रतिपुर्ती असणार नाही.
- संबंधित उमेदवाराला कंत्राटी नियुक्ती संपण्यापूर्वी सदर कंत्राटी नियुक्ती रद्द करावयाची असल्यास त्याने तशी १ महिना आगाऊ सूचना देणे आवश्यक आहे. जर तशी आगाऊ सूचना न दिल्यास संबंधितांकडून एक महिन्याचा मेहनताना भरणे आवश्यक आहे आणि अशा व्यक्तीची कंत्राटी नियुक्ती भविष्यात घेतला जाणार नाही.
- सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४४३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या कंत्राटी नियुक्ती कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायमस्वरुपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.
- कंत्राटी नियुक्ती पध्दतीच्या अटी व शर्ती मान्य असल्यास त्याप्रमाणे हमीपत्र रुपये १००/— किंमतीच्या स्टॅम्पपेपरवर लिहून देऊन सादर करावे.
- कामाची आदायगी महिन्यातून एक वेळी करणेत येईल. त्यासाठी केलेल्या कामाचे बील सादर करावे लागेल. सदर रक्कम बॅक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.
- वरीलप्रमाणे काम करणेचे प्रति महा दर नमूद करावे.
- अर्धवट काम सोडल्यास किंवा काम अपूर्ण असल्यास बीलांची आदायगी होणार नाही व आपले नाव पुढील कामाच्यावेळी ग्राहय धरले जाणार नाही.
- वरीलप्रमाणे नमुद केलेली सर्व कामे माहे मे २०२३ ते फेब्रुवारी २०२४ पर्यंत या कालावधीत कार्यालयीन वेळेत करावयाचे आहेत.
- याबाबतचे सर्व अधिकार मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली यांनी राखून ठेवलेले आहेत.
- दैनंदिन कामाचे मोजमाप करण्यात येईल. पूर्ण झालेल्या कामांचाच मोबदला आदायगीसाठी ग्राहय धरण्यात येईल.
- सदरचे कंत्राटी काम करत असताना प्रक्षेत्र आणि कार्यालय दोन्ही ठिकाणचे कार्यालयीन शिष्टाचार पाळणे बंधनकारक आहे.
- उपरोक्त कंत्राटी पदाची मुलाखती घेवून नियुक्ती देण्यात येणार असून मुलाखतीची तारीख आपणांस कळविण्यात येईल.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता. दापोली, जि. रत्नागिरी

ठिकाण :— टेटवली
दिनांक :— ३१/०३/२०२३

| पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिकटवण्यात यावा. |
| --- |

# अर्जाचा नमुना

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| १. | पदाचे नाव | : | |
| २. | कार्यालयाचे/विभागाचे नाव | : | |
| ३. | अर्जदाराचे नाव | : | |
| ४. | पत्ता अ) सद्याचा पत्ता<br>ब) कायमचा पत्ता | : | |
| ५. | जन्मतारीख | : | |
| ६. | वय | : | |
| ७. | धर्म/जात | : | |
| ८. | भ्रमणध्वनी कमांक | : | |
| ९. | ई—मेल आयडी | : | |
| १०. | शैक्षणिक अर्हता | : | |
| ११. | इतर शैक्षणिक अर्हता | | |

| परीक्षा | बोर्ड/महाविद्यालयाचे/शाळेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
| --- | --- | --- | --- |
| | | | |
| | | | |

१२. अनुभव

| पदाचे नाव | कालावधी | | कामाचे स्वरूप | कामाचे ठिकाण |
| --- | --- | --- | --- | --- |
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |

१३. इतर

मी असे लिहुन देतो/देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असुन ती सत्य आहे. सदर माहिती खोटी आढळुन आल्यास उपरोक्त पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

दिनांक :—

ठिकाण :— स्वाक्षरी

टिप :— अर्जासोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती सत्यप्रत केलेल्या असाव्यात.जर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित केल्या असतील तर शासन निर्णय क्र. प्रसुधा/१६१४/३४५/प्र.क्र.७१/१८/अ,दि. ०९/०३/२०१५ अन्वये विहित नमुन्यातील स्वयंसाक्षाकनाचे स्वयंघोषणापत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार

अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना

प्रतिज्ञापत्र

नमुना — अ

(नियम ४ पहा)

मी श्री./श्रीमती/कुमारी.......................................................................................................................
श्री...................................................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी
वय ............................ वर्ष, राहणार..................................................यादवारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी ........................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला .........................................(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............................आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

३. हयात असलेली मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्य ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

(उमेदवाराची स्वाक्षरी)

दिनांक :—

ठिकाण :—